महाराष्ट्र पोलीस
पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल. बी. एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसुचना/ ७८ /२०२३ दि. १३/०५/२०२३

**–: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–**

**ज्याअर्थी**, ठाणे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील कळवा वाहतूक उप विभागाचे हद्दीत विटावा जकात नाका ते छत्रपती शिवाजी महाराज चौक (कळवा नाका) तसेच स्वागत हॉटेल ते बुधाजी नगर चौक ते घडयाळ चौक ते राणा टॉवर ते कळवा स्टेशन, कावेरी सेतु तसेच कळवा नाका ते पारसिक सर्कल तसेच मनिषा नगर परिसर दरम्यान मोठया प्रमाणात शाळा, विद्यालये तसेच सरकारी कार्यालये असून नमूद रस्त्यावर मोठया प्रमाणात वाहतूकीची वर्दळ होत असते. रस्त्याचे कडेला दुचाकी, चार चाकी वाहने अस्ताव्यस्तपणे उभी करण्यात येत असल्याने इतर वाहनांना वाहतुकीस अडथळा निर्माण होतो. सदर परिसरात वाहतूक कोंडी होवू नये, वाहतूक सुरळीत व सुनिश्चित होण्यासाठी खालील ठिकाणी **नो पार्किंग, पी–१ व पी–२ पार्किंग, समांतर (Parallel) पार्किंग** व्यवस्था होणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी**, मी **डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे. :–

**१) नो पार्किंग, समांतर पार्किंग, पी १ व पी २ पार्किंग व्यवस्था करण्यात आलेले ठिकाण :–**

| अ.क्र. | जाताना | पार्किंग व्यवस्था | येताना | पार्किंग व्यवस्था | वेळ |
|---|---|---|---|---|---|
| १ | विटावा जकात नाका ते एस. टी. बस आगार (बेलापूर–ठाणे रोडवर) | १३०० मि नो पार्किंग | कळवा नाका ते विटावा जकात नाका (ठाणे–बेलापूर रोडवर) | १५०० मि. नो पार्किंग | २४ तास |
| २ | श्रिनिका हॉस्पिटल ते स्वागत हॉटेल | २०० मि नो पार्किंग २४ तास | स्वागत हॉटेल ते श्रिनिका हॉस्पिटल | २०० मि समांतर पार्किंग | २१:०० ते ०६:०० |
| ३ | निहार सोसायटी ते शंकर मंदिर चौक | २०० मि नो पार्किंग | शंकर मंदिर चौक ते निहार सोसायटी | २०० मि नो पार्किंग | २४ तास |
| ४ | कळवा नाका ते कावेरी सेतू कट | १००० मि नो पार्किंग | कावेरी सेतू कट ते कळवा नाका | १००० मि नो पार्किंग | २४ तास |
| ५ | ६० फिट रोड कट (स्वामी समर्थ मठ) ते मॅपल बिल्डींग | ५०० मि नो पार्किंग | मॅपल बिल्डींग ते ६० फिट रोड कट (स्वामी समर्थ मठ) | ५०० मि नो पार्किंग | २४ तास |
| ६ | ६० फिट रोड कट (स्वामी समर्थ मठ) ते पारसिक सर्कल | २४०० मि नो पार्किंग | पारसिक सर्कल ते ६० फिट रोड कट (स्वामी समर्थ मठ) | २४०० मि नो पार्किंग | २४ तास |
| ७ | सहकार विद्यालय ते कळवा स्टेशन (स्टेशन पार्किंग वगळून) | ९०० मि नो पार्किंग | कळवा स्टेशन (स्टेशन पार्किंग वगळून) ते सहकार विद्यालय | ९०० मि नो पार्किंग | २४ तास |
| ८ | कळवा स्टेशन ते अल्बा टायपिंग सेंटर | ३०० मि नो पार्किंग | अल्बा टायपिंग सेंटर ते कळवा स्टेशन | ३०० मि नो पार्किंग | २४ तास |
| ९ | राणा टॉवर ते घडयाळ चौक | ३०० मि नो पार्किंग | घडयाळ चौक ते राणा टॉवर | ३०० मि नो पार्किंग | २४ तास |
| १० | घडयाळ चौक ते कळवा मेडीकल ते कळवा सुपर मार्केट ते कळवा नाका | ३०० मि नो पार्किंग | कळवा नाका ते कळवा सुपर मार्केट ते कळवा मेडीकल ते घडयाळ चौक | ३०० मि नो पार्किंग | २४ तास |
| ११ | मनिषा नगर गेट नं. ०१ ते कळवा प्राथमिक आरोग्य केंद्र | ३५० मि नो पार्किंग | कळवा प्राथमिक आरोग्य केंद्र ते मनिषा नगर गेट नं. ०१ | ३५० मि नो पार्किंग | २४ तास |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १२ | जी.पी. पारसिक बँक कट ते मनिषा नगर गेट नं. ०३ | १५० मि<br>नो पार्किंग | मनिषा नगर गेट नं. ०३ ते जी. पी पारसिक बँक कट | १५० मि<br>नो पार्किंग | २४ तास |
| १३ | कळवा सुपर मार्केट ते ठाकूर चौक | २०० मि<br>नो पार्किंग | ठाकूर चौक ते कळवा सुपर मार्केट | २०० मि<br>नो पार्किंग | २४ तास |
| १४ | कळवा मेडीकल ते गावदेवी मच्छी मार्केट ते कावेरी सेतू | ९०० मि<br>नो पार्किंग | कावेरी सेतू ते गावदेवी मच्छी मार्केट ते कळवा मेडीकल | ९०० मि नो पार्किंग | २४ तास |
| १५ | खारेगाव नाका ते पारसिक बँक (खारेगाव रोड) | १५० मि<br>नो पार्किंग | पारसिक बँक (खारेगाव रोड) ते खारेगाव नाका | १५० मि नो पार्किंग | २४ तास |
| १६ | सहकार विद्यालय कट ते बिंदुमाधव पर्यंत | २०० मि<br>नो पार्किंग | बिंदुमाधव कट ते सहकार विद्यालय कट | २०० मि नो पार्किंग | २४ तास |
| १७ | ओमकार अपार्टमेंट ते पंचरत्न सोसायटी ते खारेगाव कट | ५०० मि<br>समांतर पार्कीग | खारेगाव कट ते पंचरत्न सोसायटी ते ओंकार अपार्टमेंट | ५०० मि<br>समांतर पार्किंग | २१:००<br>ते ०६:०० |
| १८ | श्रीनिका हॉस्पिटल ते घडयाळ चौक | २५० मि<br>समांतर पार्किंग<br>२१:००<br>ते ०६:०० | घडयाळ चौक ते प्रभाग समिती पर्यंत | १०० मि<br>समांतर पार्किंग<br>(सरकारी वाहनांकरीता) | १०:००<br>ते<br>१७:०० |
| १९ | बुधाजी नगर कमान ते निहार सोसायटी कट | २०० मि<br>पी १ पी २<br>समांतर पार्किंग | – | – | २४ तास |
| २० | राणा टॉवर ते अल्बा टायपिंग सेंटर | २५० मि<br>पी १ पी २<br>समांतर पार्किंग | – | – | २४ तास |
| २१ | मनिषानगर गेट नं. ०३ ते श्री कृपा बिल्डर ऑफिस कट | ४०० मि<br>पी १ पी २<br>समांतर पार्किंग | – | – | २४ तास |
| २२ | डॉमिनोज पिझ्झा उतरणी ते केशव पार्क बिल्डींग | १०० मि<br>पी १ पी २<br>समांतर पार्किंग | – | – | २४ तास |
| २३ | मॅपल बिल्डीग ते पारसिक बँक रोड | १०० मि<br>पी १ पी २<br>समांतर पार्किंग | – | – | २४ तास |

सदरची अधिसुचना प्रसिध्द झाल्या तारखेपासुन १५ दिवस प्रायोगिक तत्वावर लागू करण्यात येत आहे. काही हरकत अगर सुचना असल्यास त्या लेखी स्वरुपात पोलीस उप आयुक्त, शहर वाहतूक शाखा कार्यालय, तीन हात नाका, एल. बी. एस. मार्ग, ठाणे, ४००६०२ येथे पाठवाव्यात. याबाबत कोणाच्या काही हरकत अथवा आक्षेप प्राप्त न झाल्यास सदरची अधिसुचना पुढील आदेश होई पावेतो कायम स्वरुपात अंमलात राहील.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसुचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडॉर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( डॉ. विनयकुमार मे. राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर :–**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर

मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर

मा. पोलीस आयुक्त, नवी मुंबई

मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर

मा. जिल्हाधिकारी, ठाणे

मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे

पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१/ वि.शा. ठाणे

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, नवी मुंबई.

**प्रत कार्यवाहीसाठी :–**

प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे

परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे,

परिवहन व्यवस्थापक, नवी मुंबई महानगरपालिका.

विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे.

नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे

प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर

२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे

२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– सपोआ वाहतूक विभाग, ठाणे व पो.निरी.नौपाडा, ठाणेनगर, कळवा, राबोडी, मुंब्रा वाहतूक उप विभाग ठाणे.